पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११८/२०१९
दिनांक : २५/०२/२०१९

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **०१/०३/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०१/०३/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **२१**

दिनांक : **०१/०३/२०१९** वेळ : स.**११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०१/०३/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ७२ झोपडपट्या असुन त्यातील नागरिकांचे सोयीसाठी मनपामार्फत या झोपडपट्यामध्ये सोयीसुविधा पुरविल्या जातात. नागरी दलित वस्ती सुधारणा अंतर्गत पिंपळे गुरव येथील दलित वस्त्यांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे विषयक सेवा सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने सदरहु कामास मा.विधी समितीची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी पिंपळे गुरव येथील दलित वस्त्यामध्ये आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाची अंदाजपत्रकिय र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू. तीस लाख फक्त) प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ७२ झोपडपट्या असुन त्यातील नागरिकांचे सोयीसाठी मनपामार्फत या झोपडपट्यामध्ये सोयीसुविधा पुरविल्या जातात. नागरी दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्र.३० मधील सिद्धार्थनगर, गुलाबनगर, संजयनगर व उर्वरित ठिकाणी ड्रेनेज व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेविषयक सेवा सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने सदरहु कामास मा. विधी समितीची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.३० मधील सिद्धार्थनगर, गुलाबनगर, संजयनगर व उर्वरित ठिकाणी ड्रेनेज व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे. या कामास अंदाजपत्रकिय र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू. तीस लाख फक्त) प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत दलित वस्तीमध्ये सर्वंकष विकासासाठी येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण विषयक नलिका पुरविणेकामी प्रस्तावित करणेकामी शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/१५९२ /प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय पुणे-१ यांच्याकडील अर्धसमास पत्र क्र.पसन/कावि/४१७/२०१८ दि.२५.०९.२०१८ चे अन्वये कळविले आहे. त्यानुसार प्रभाग क्र.२५ वाकड येथील अनुसुचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण नलिका टाकणे कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८–१९ व SSR २०१८-१९ च्या दर सुची नुसार जलनिःसारण विभागामार्फत तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रू.२९,८१,०३९/- इतकी आहे. शासन निर्णय क्र. विघयो/ १०२००० / १५९२ / प्रक्र / १८९ / नवि / ४

दि.०५.०३.२००२ अन्वये सन २०१८-१९ मध्ये लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती विकास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त रक्कम रूपये ४.०० कोटी नियत व्ययामधून सदर काम करणेत येणार आहे. तरी दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत प्रभाग क्र.२५ वाकड, येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणेकामी र.रू.२९,८१,०३९/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख एक्याऐंशी हजार एकोणचाळीस फक्त) अंदाजपत्रकिय रकमेस प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत दलित वस्तीमध्ये सर्वंकष विकासासाठी येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण विषयक नलिका पुरविणेकामी प्रस्तावित करणेकामी शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/१५९२ /प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय पुणे-१ यांच्याकडील अर्धसमास पत्र क्र.पसन/कावि/४१७/२०१८ दिनांक २५.०९.२०१८ चे अन्वये कळविले आहे. त्यानुसार प्रभाग क्र.१९ उद्योगनगर, दळवीनगर येथील अनुसुचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण नलिका टाकणे कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८–१९ व SSR २०१८-१९ च्या दरसुची नुसार जलनिःसारण विभागामार्फत तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रू.३०,००,०००/- इतकी आहे. शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/ १५९२/प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ अन्वये सन २०१८-१९ मध्ये लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती विकास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त र.रू.४.०० कोटी नियत व्ययामधून सदर काम करणेत येणार आहे. तरी दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत प्रभाग क्र. १९ उद्योगनगर, दळवीनगर येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाच्या र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू.तीस लाख फक्त) अंदाजपत्रकिय रकमेस प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११८/२०१९
दिनांक : २५/०२/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc